CNRNOMHSI04–000302–2017

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.१ यांचा पुढील सरतपास</u>**

**<u>वादीतर्फे विधिज्ञ श्री.के.डी.वारंग यांचे मार्फत शपथेवर सुरु –</u>**

१. मी प्रस्तुतकामी प्रतिवादी यांनी दावा जमीन सर्व्हे नं.३३, अनुक्रम नं.१५ ची मोजणी मागितल्याबाबतची कागदपत्रे हजर केलेली आहेत. त्याची सही–शिक्क्यांची नक्कल मी सादर केलेली आहे. ती मला दाखविलेस मी ती ओळखू शकतो. आता साक्षीदारास निशाणी क्र.८५ लगत अनुक्रम नं.१९ कडील कागदपत्रे दाखविण्यात आली. साक्षीदार सांगतो की, ती तीच आहेत. सदरचे कागदपत्र मला मिळाल्याप्रमाणे मी दाखल केलेले आहेत. (सदर कागदपत्रे ही, प्रतिवादी यांनी मागणी केलेल्या मोजणीबाबत असल्याने ती खाजगी स्वरुपाची आहेत. त्यातील मजकूराबाबत वादी शाबीत करु शकत नाही. त्याकरीता सदर कागदपत्रास ओळखीकरीता **निशाणी क्र.९७** देणेत येते.)

२. मी प्रस्तुतकामी प्रतिवादी यांनी दावा जमीन सर्व्हे नं.३३, अनुक्रम नं.१३ ची मोजणी मागितल्याबाबतची कागदपत्रे हजर केलेली आहेत. त्याची सही शिक्क्यांची नक्कल मी सादर केलेली आहे. ती मला दाखविलेस मी ती ओळखू शकतो. आता साक्षीदारास निशाणी क्र.८५ लगत अनुक्रम नं.१९ कडील कागदपत्रे दाखविण्यात आली. साक्षीदार सांगतो की, ती तीच आहेत. सदरचे कागदपत्र मला मिळाल्याप्रमाणे मी दाखल केलेले आहेत. (सदर कागदपत्रे ही, प्रतिवादी यांनी मागणी केलेल्या मोजणीबाबत असल्याने ती खाजगी स्वरुपाची आहेत. त्यातील मजकूराबाबत वादी शाबीत करु शकत नाही. त्याकरीता सदर कागदपत्रास ओळखीकरीता **निशाणी क्र.९८** देणेत येते.)

३. मी प्रस्तुतकामी मंडळअधिकारी यांनी तहसिलदार यांना दिलेल्या अहवालाची सहीसुद प्रत दाखल केली आहे. ती मला दाखविलेस मी ती ओळखू शकतो. आता साक्षीदारास निशाणी क्र.८५, अनुक्रम नं.२३ कडील कागदपत्र दाखविणेत आली. साक्षीदार सांगतो की, ती तीच आहेत. सदरचा अहवाल हा तहसिलदार यांना उद्देशुन असल्याने त्याबाबत शाबीत करण्याची जबाबदारी वादी यांची आहे. करीता सदर कागदपत्रास ओळखीकरीता पुढील **निशाणी क्र.९९** देणेत येते. मी निवती पोलीस स्टेशन येथे तक्रार

दाखल केलेली होती. त्याची पोहोच प्रत मी प्रस्तुतकामी हजर केलेली आहे. ती मला दाखविलेस मी ती ओळखू शकतो. आता साक्षीदारास निशाणी क्र.८५ कडील पोहोच दाखविणेत आली. त्यावर माझी सही आहे. त्यावर पोलिसांचा तक्रार पोहोच झाल्याबाबत सही व शिक्का आहे. त्यास **निशाणी क्र.१००** देणेत येते.

४. सदर तक्रारीच्या अनुषंगाने वादी व प्रतिवादी यांना बोलावून घेतलेले जाबजबाब मी प्रस्तुतकामी हजर केलेले आहेत. ते मला दाखविलेस मी ते ओळखू शकतो. आता साक्षीदारास निशाणी क्र.८५, अनुक्रम नं.२५ कडील कागदपत्र दाखविणेत आले. साक्षीदार सांगतो की, ती तीच कागदपत्र आहेत. (सदर कागदपत्रांचे स्वरुप पाहता ते फौ.प्र.सं. कलम १६१ खालील जबाब असल्याने त्याच्या विधिग्राह्यतेच्या अधीन राहून) त्यास पुढील **निशाणी क्र.१०१** देणेत येते.

५. मला वादी यांनी दिलेले कुलअखत्यारपत्राची मुळ प्रत मी हजर केलेली आहे. ती मला दाखविलेस मी ती ओळखू शकतो. आता साक्षीदारास निशाणी क्र.८५, अनुक्रम नं.२८ कडील मुळ प्रत दाखविणेत आली. साक्षीदार सांगतो की, सदरचे अखत्यारपत्र नोटरी विधिज्ञ यांचेसमक्ष करणेत आले असून, त्यावर वादी व माझी सही आहे व त्यावर नोटरी विधिज्ञ यांचा सही व शिक्का आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास पुढील **निशाणी क्र.१०२** देणेत येते.

(इतर सर्व दाखल कागदपत्र हे सार्वजनिक दस्त असल्याने व प्रतिवादीतर्फे विधिज्ञ यांनी सदर कागदपत्रांना निशाणी देणेस हरकत नसल्याचे कथन केल्याने त्यांना अनुक्रमे पुढील निशाणी देणेत आलेली आहे.)

**जादाचा सरतपास पुर्ण.**

श्रवणोत्तर स्वीकृती

सही/-

(आर.जी.कुंभार)

दिनांक- १४/०१/२०२६

अति.सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),कुडाळ.